# सरकारची सहकाराबद्दल जबाबदारी

भारताचे संविधान हे संपूर्ण देशासाठी लागू आहे. संविधानामध्ये म्हणजेच भारताच्या घटनेमध्ये **कलम ३८, ३९ व ३९ – क** नुसार **लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाज व्यवस्था प्रस्थापित करणे,** त्यासाठी **विविध प्रकारची धोरणे व तत्वे निश्चित करणे** आणि **समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य** देण्याची तरतुद आहे.

सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाद्वारे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व घटनांमध्ये प्रेरणा निर्माण करील अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करून तिचे जतन करण्याचे आणि लोककल्याणाचे संवर्धन करणे ही सरकारची जबाबदारी आहे. राज्य हे केवळ विशिष्ठ व्यक्ती किंवा संस्था डोळ्यासमोर ठेवून चालविण्याची गोष्ट नाही. निरनिराळ्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या किंवा व्यवसाय करणाऱ्या समुहाला देखील दरडोई उत्पन्नाची विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी जाणीवपुर्वक योजना आखून आटोकाट प्रयत्न करण्याची जबाबदारी सरकारचीच आहे. कारण **व्यवस्थेचा दर्जा, सुविधा व संधी यांच्यामध्ये असलेली विषयमता नाहीशी करण्यासाठी सुध्दा सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न** करण्याची तरतुद वरील घटनेच्या कलमात आहे.

या देशात जन्मलेल्या प्रत्येक स्त्री – पुरूषाला उपजिविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क घटनेने कलम ३९ नुसार स्पष्टपणे दिलेला आहे. यासाठी सरकारने सामुहिक हिताला उपकारक होईल अशाच पध्दतीने साधन संपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी करण्याची जबाबदारी सरकारची आहे. प्रामुख्याने आर्थिक बाबतीत असे कुठलेही कृत्य सरकारला करता येणार नाही की, ज्यामुळे जनतेच्या हितास बाधा येईल. **शिवाय पुरुष आणि स्त्री या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन देण्याचे बंधन ह्याच कलमात आहे.** तसेच स्त्री आणि पुरुष कामगारांचे आरोग्य व त्यांची ताकद व लहान मुलांचा दुरुपयोग आर्थिक गरजेपोटी कसा होणार नाही, ह्याकडे जाणीवपूर्वक लक्ष ठेवण्याची जबाबदारी घटनेप्रमाणे सरकारचीच आहे.

कुठल्याही परिस्थितीत मुक्त व प्रतिष्ठा पूर्ण वातावरणात प्रत्येकाला आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा देण्याची जबाबदारी सुध्दा सरकारची आहे. लहानमुले व युवक यांचे शोषण न होण्यासाठी सरकारने त्यांना पूर्णपणे संरक्षण देणे अभिप्रेत आहे. घटनेच्या कलम ३९ – क नुसार कायद्याची यंत्रणा राबविताना समान संधीच्या तत्वावर दृष्टीकोन ठेवून विशेषत: आर्थिकदृष्टया दुर्बल व ज्या असमर्थता आहे अशा कुठल्याही नागरिकाला न्याय मिळण्याची संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सरकारचीच आहे. यासाठी सरकारने कायदेविषयक मदत मोफत उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे घटनेच्या ४४ कलमानुसार प्रत्येक भारतीयाला त्या – त्या राज्यात **सर्वत्र एकरूप नागरिक संहिता लाभावी** यासाठी राज्य सरकारने दायित्व स्विकारले पाहिजे. व कलम ४५ नुसार १४ वर्षाच्या आतील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतुद करून त्याची अंमलबजावणी सरकारने करायला पाहिजे.

थोडक्यात भारताचे संविधान आणि वर उल्लेखलेल्या संविधानतील कलमातील मुद्दे याला अधिन

राहून सरकार सहकारासाठी फार चांगले काम करू शकते. त्यासाठी संविधानाची आपोआप मदत उपलब्ध आहेच. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० जो सर्वांसाठी, सर्व सहकारी संस्थांसाठी समान पध्दतीने लागू करण्याची भुमिका सरकार स्विकारताना मात्र दिसत नाही. सहकार कायदा ठराविक लोक व सहकारी संस्था डोळ्यासमोर ठेवून ज्यावेळेला महाराष्ट्र राज्यात वापरला जातो त्यावेळेला त्याची परिणीती केवळ राज्याच्या किंवा केंद्राच्या अर्थ व्यवस्थेवर होत नसून संपूर्ण व्यवस्थेला धक्का पोहचेल अशीच होते. उदाहरणा दाखल अत्यंत उद्दात्त भावनेने व लोककल्याणाची भावना डोळ्यासमोर ठेवून राज्यातील साखर कारखान्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात आले. अलीकडच्या काळात छोट्याश्या गावागावात देखील पतसंस्थांचे जाळेसुध्दा चांगल्या भावनेने पसरविण्यात आले. आणि आज रोजी **२० हजारांच्यावर नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था असून २०० च्या वर सहकारी साखर कारखाने** या राज्यात सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत आहेत. परंतु साखर कारखाने व पतसंस्था कुठल्याही कारणास्तव आपल्या धेय्य उद्दीष्टाप्रमाणे सभासदांचे हित साधण्यास कमी पडण्यास ज्यावेळेस सुरवात झाली, त्यावेळेस सरकारने मात्र देशाच्या संविधानाचा उपयोग केवळ साखर कारखान्यांसाठी केला. **हजारो कोटी रूपये सहकारी साखर कारखान्यानांना सरकारने विविध माध्यमातून उपलब्ध करून दिले. परंतु १ हजार पैसे सुध्दा सरकारने पतसंस्थांना उपलब्ध करुन दिले नाहीत**. ही बाब अत्यंत दुर्दैवी व भविष्यकाळात नकारात्मक दृष्परिणाम घडविणारी घटना आहे.

ज्यांनी सहकारी साखर कारखाने स्थापन केले, चालविले, शेकडो करोडो रूपये सरकारकडून मिळविले तेच सर्व सहकारातील सभासद, संचालक पदाधिकारी झाले. व तीच सर्व प्रमुख मंडळी राजसत्तेत बसून विविध कायद्याच्या आधारे ह्याच **साखर कारखान्यांना हजोरो कोटी रूपये उपलब्ध करून देण्यात यशस्वी झाली**, परंतु ह्या कायद्याचा सुकानू पतसंस्थांच्या दिशेने मात्र हीच मंडळी वळवू शकली नाही, आणि याचा फार मोठा रोष हळू हळू भोगावा लागणार याची कल्पनासुध्दा संबंधितांना आली नाही ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

कराच्या माध्यामातून जनतेकडून मिळविलेल्या पैशाचे नियोजन विषमतेने करण्याची कुठलीही तरतुद घटनेमध्ये नाही. परंतु दुर्दैवाने या देशातील जनता व कायदा यामध्ये लाखो मैलाचे अंतर असल्यामुळे **सर्वसामान्य जनतेला न्याय मिळविण्याच्या प्रक्रियेत शेवटपर्यंत टिकून राहता येणे शक्य नाही.** कारण या **देशातला कायदाच अत्यंत महाग आहे**. व एखादी महाग वस्तू या देशातील सर्वसामान्य माणूस खरेदी करू शकत नाही. ती महाग वस्तू ज्यांनी सरकारचेच पैसे कर्ज रूपाने, अनुदानाने, देणगीने व अन्य मार्गाने मिळविले व संस्था उभ्या केल्या व प्रचंड मनुष्यबळ तैनातीला ठेवले, त्याच लोकांसाठी ही व्यवस्था उपलब्ध आहे. यासाठी आतातरी समान न्यायाच्या वाटा पोट भरलेल्यांनी दुसऱ्यासाठी मोकळ्या करून द्याव्यात. अन्यथा आतापर्यंत जनतेचेच पैसे ज्यांनी पध्दतशीरपणे कायद्याच्या चौकटीत राहुन लुबाडले परंतु वरीलप्रमाणे पैसा व सत्तेच्या जोरावर कोणावरही अशाप्रकारचा गुन्हा अद्याप दाखल झाला नाही व जेलमध्ये जावून सजा झाली नाही. त्यामुळे हे आतापर्यंत बिनबोभाट चालू आहे. **परंतु प्रत्येकाचा शेवट निश्चित असतो.** यासाठी समान न्यायाची भुमिका जर लवकरात लवकर स्विकारली नाही अराजकतेच्या वावटळीत संबंधीत लोक केव्हा गडप होतील हे कोणालाही सांगता येणार नाही.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!